महाराष्ट्र जनशक्ती

**ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.


महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४७ वा दिनांक : १२/११/२०२४ वार : मंगळवार


## कर्नाटकच्या मंत्र्यांनी केंद्रीय मंत्री कुमारस्वामी यांना 'कालिया' म्हटले



**बंगळूरू :** कर्नाटकचे गृहनिर्माण मंत्री बी. झेड. जमीर अहमद खान यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एचडी कुमारस्वामी यांना 'कालिया' असे संबोधले. खान हे चन्नापटना विधानसभेच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार सीपी योगेश्वर यांच्या प्रचारासाठी आले होते. कुमारस्वामी यांचा मुलगा निखिल कुमारस्वामी येथून जनता दल सेक्युलर (जेडीएस) निवडणूक लढवत आहे.

रामनगरमधील सभेत खान म्हणाले - सीपी योगेश्वर भाजपमध्ये सामील झाले होते, परंतु ते काँग्रेसमध्ये परतले आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षातील मतभेदांमुळे त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. नंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

खान म्हणाले की, योगेश्वर यांच्याकडे भाजपमध्ये येण्याशिवाय पर्याय नव्हता. ते जेडीएसमध्ये जाण्यास तयार नव्हते, कारण 'कालिया कुमारस्वामी' हे भाजपपेक्षा जास्त धोकादायक होते. आता ते (योगेश्वर) घरी परतले आहेत.

जेडीएसने जमीर अहमद खान यांना मंत्रिमंडळातून हटवण्याची मागणी केली. जेडीएस म्हणाले- मंत्र्याचे वक्तव्य वंशद्वेषी आहे. पक्षाने खान यांना सांगितले- तुम्हाला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, एचसी महादेवप्पा, सतीश जारकीहोली, प्रियांक खरगे आणि केएच मुनियप्पा यांचा रंग माहित असावा.

आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देताना जमीर अहमद खान म्हणाले- माजी मुख्यमंत्री एचडी कुमारस्वामी मला 'कुल्ला' (बौने) म्हणत. मी केंद्रीय मंत्री यांना 'करियान्ना' (काळा भाऊ) म्हणत आलो आहे. कुणालाही दुखवण्याचा माझा हेतू नव्हता.

## उद्धव ठाकरेंच्या बॅग तपासणीवर संजय राऊतांचा इशारा



**मुंबई :** निवडणूक अधिकाऱ्यांकडून वणी येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हेलिकॉप्टर आणि बॅगांची तपासणी करण्यात आली. यावरून यावरून संजय राऊत यांनीही सरकारला धारेवर धरले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि त्यांच्या मंत्र्यांच्या तपासण्या होत नाहीत, असे राऊत म्हणाले. त्यांची वाहने आणि हेलिकॉप्टरमधून पैशांचे वाटप पोलिस बंदोबस्तात सुरू आहे, असा आरोपही संजय राऊत यांनी केला.

उद्धव ठाकरे यांची सोमवारी दुपारी वणी विधानसभा मतदारसंघात प्रचारसभा झाली. तत्पूर्वी, त्यांचे हेलिकॉप्टर येथील हेलिपॅडवर लँड होताच अधिकारी त्यांच्या बॅगा तपासण्यास सरसावले. यावेळी उद्धव ठाकरे काहीसे संतप्त झाले. पण त्यांनी फार संयमाने परिस्थिती हाताळली. त्यांनी या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ स्वतः चित्रित करून अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यानंतर संजय राऊत यांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरत त्यांच्याकडून पोलिसांच्या गाड्यांचा आणि पोलिस यंत्रणेचा वापर पैसे वाटपासाठी केला जात असल्याचा दावा केला.

नाकाबंदी ही विरोधी पक्षासंदर्भातच आहे ही काय? असा सवाल संजय राऊत विचारला आहे. लोकसभा निवडणुकीत मी एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरमधून उतरलेल्या बॅगांचे चित्रण दाखवले होते. एका सभेला ते दोन तासांसाठी आले होते. एकापाठोपाठ बारा बॅगा उतरवल्या. त्यांची सुरक्षा व्यवस्थेता त्या बॅगा व्यवस्थित उतरवून त्यांचे मॅनेजमेंट करत होते. अशा अनेक गोष्टी आम्ही त्या काळात निवडणूक आयोगाला दाखवल्या आणि आताही दाखवत आहोत, पण त्यासंदर्भात कारवाई होत नाही, असा आरोप संजय राऊत यांनी केला.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याही बॅगची तपासणी केली. लोकसभा निवडणुकीवेळी आमच्या बॅगा तपासल्या. यापुढेही करतील. सगळ्यांना सारखा नियम लावणार असाल, तर आमची काही हरकत नाही. पण तुम्ही तुमच्या स्टाफला महाविकास आघाडीच्या नेत्यांच्याच वाहनांची तपासणी करण्याचे ट्रेनिंग दिले असेल, तर त्याबाबत आम्हाला गांभीर्याने विचार करावा लागेल, असेही संजय राऊत म्हणाले.

## प्रियंका गांधींचे राजकीय भविष्य उद्या मतपेटीत होणार बंद

**थिरूवनंतपूरम :** केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघात सोमवारी पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार समाप्त झाला. त्या मतदारसंघात बुधवारी (१३ नोव्हेंबर) मतदान होईल. काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी उमेदवार म्हणून नशीब आजमावत असल्याने ती पोटनिवडणूक लक्षवेधी बनली आहे.अखेरच्या दिवशी प्रियंका यांच्या प्रचारात त्यांचे बंधू आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हेही सहभागी झाले. राहुल यांनी लोकसभेतील वायनाडची जागा रिक्त केल्याने तिथे पोटनिवडणूक होत आहे.

काँग्रेसने त्या मतदारसंघात प्रियंका यांना उमेदवारी दिली. उमेदवार म्हणून त्या प्रथमच निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरोधात केरळमधील सत्तारूढ डाव्या आघाडीने सत्यन मोकेरी, तर भाजपने नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे वायनाडमधील पोटनिवडणुकीला तिरंगी लढतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.अर्थात, तो मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो.

त्यातून प्रियंका यांच्या संसदेतील एन्ट्रीची निश्चिती करण्यासाठी पक्षाने वायनाडसारख्या सुरक्षित मतदारसंघाची निवड केल्याचे मानले जाते. मात्र, प्रियंका यांच्या विरोधात निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना चकित करणाऱ्या निकालाची अपेक्षा आहे. तो निकाल जाहीर होण्यासाठी २३ नोव्हेंबर या दिवसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४


## सदा सरवणकरांना घरात नो एन्ट्री

### प्रचाराला आलेले पाहताच महिलेचा राग अनावर



**मुंबई :** सदा सरवणरकर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी माहीम मतदारसंघ पिंजून काढत आहेत नुकतेच ते कार्यकर्त्यांसह माहीम कोळीवाड्यात प्रचारासाठी गेले असता, त्यांना एका महिलेच्या रोषाला सामोरे जावे लागले. सदा सरवणकर घरासमोर येताच त्या महिलेचा राग अनावर झाला. तिने सरवणकरांवर प्रश्नांचा भडिमार करत आपला रोष व्यक्त केला. तसेच सदा सरवणकर यांना घरातही येऊ दिले नाही. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

सदा सरवणकर प्रचारासाठी घरासमोर आल्यानंतर कोळी महिलेने माहीममधील कोळीवाडा येथील फिश फूड स्टॉल हटवल्यामुळे सदा सरवणकरांना जाब विचारला. सदा सरवणकरांनी लाडकी बहीण म्हणत समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, कोळीवाड्यातील महिला चांगलीच संतापल्याचे दिसून आले. त्या महिलेने सदा सरवणकरांना घरातही येऊ दिले नाही. त्यामुळे सदा सरवणकरांना माघारी फिरावे लागले.

सदा सरवणकर प्रचारासाठी माहिममधील कोळीवाड्यात गेले होते. यावेळी ते एका कोळी महिलेशी संवाद साधण्यासाठी गेले असता त्या कोळी महिलेने आम्ही फूड स्टॉल लावत होतो, तो का बंद करायला लावला हे आधी सांगा. कधी चालू करणार? तुमच्या हातापाया पडून झाले. आमच्या पोटावर आले आहे. लाडकी बहीण सांगता मग आम्ही कुठली लाडकी बहीण आहोत, ते सांगा? असा प्रश्नांचा भडिमार सदा सरवणकरांवर केला. त्यावर आपण घरात बसून चर्चा करुया, असे सदा सरवणकर म्हणाले. मात्र, त्या महिलेने सदा सरवणकरांना घरात घेतले नाही.

## उद्धव ठाकरेंनंतर अमोल कोल्हेंच्या बॅगची तपासणी





**सांगली :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बॅगची निवडणूक अधिकाऱ्यांनी वणी येथे तपासणी केली होती. त्यानंतर आता शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या बॅगची निवडणूक अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली. याबाबत अमोल कोल्हे यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट करत काही प्रश्न उपस्थित केले आहेत. नियम फक्त विरोधी पक्षांनाच असतात अन् सत्ताधाऱ्यांना सगळीकडे मोकळे रान असते हे मान्य नाही, असे अमोल कोल्हे म्हणाले. विशेष बाब म्हणजे निवडणुकीच्या काळात आपल्या बॅगची दुसऱ्यांदा तपासणी करण्यात आल्याचे अमोल कोल्हे यांनी सांगितले.

अमोल कोल्हे म्हणाले, आज पुन्हा बॅग तपासली गेली, विधानसभा निवडणुकीदरम्यान दुसऱ्यांदा तपासणी झाली. आजच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेबांचीही तपासणी झाली. नियम असतात हे मान्य आहे, पण नियम फक्त विरोधी पक्षांनाच असतात अन् सत्ताधाऱ्यांना सगळीकडे मोकळे रान असते हे मान्य नाही. कायदा आहे, तर तो समानच असला पाहिजे!

## भाजपच्या 'बटेंगे तो कटेंगे' विधानावरून अजितदादांनंतर नवाब मलिकांचा विरोध



**मुंबई :** 'बटेंगे ते कटेंगे' ही घोषणा उत्तर प्रदेश आणि झारखंडमध्ये चालेल, पण महाराष्ट्रात ती चालणार नाही. मी त्याचे समर्थन करत नाही. आमचा नारा आहे - सबका साथ सबका विकास, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या नाऱ्याला विरोध केला आहे. यानंतर नवाब मलिक यांनी देखील याचा विरोध केल्याचे समोर आले आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि मानखुर्द शिवाजी नगर येथील उमेदवार नवाब मलिक यांनी देखील अजित पवारांप्रमाणे बाजू मांडली आहे. नवाब मलिक म्हणाले, म्हणतात, "बटेंगे तो कटेंगे' सारखी विधाने चुकीची, घृणास्पद आहेत. यातून कोणताही फायदा होऊ शकत नाही. अशा प्रकारच्या राजकारणामुळे उत्तर प्रदेशचे खूप नुकसान झाले आहे. अगदी मंदिराच्या उभारणीत उत्तर प्रदेशात भाजपचा दारुण पराभव झाला. त्यामुळे अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गराजांवर राजकारण केले पाहिजे. लोकांच्या विकासाची चर्चा व्हायला हवी. हिंदू-मुस्लिमच्या नावावर कोणीही देशाचे विभाजन करू नये, असे स्पष्ट मत नवाब मलिक यांनी व्यक्त केले आहे.

महायुतीच्या विशेषतः भाजपच्या उमेदवारांच्या प्रचार सभांमध्ये योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे ते कटेंगे' असे नारे दिले होते तसेच भाजपच्या नेत्यांनी देखील याला दुजोरा दिलेला असताना अजित पवारांनी मात्र याचा विरोध केला आहे. अजित पवार म्हणाले, भाजपच्या इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी काय बोलावे ते ठरवावे. महाराष्ट्राबाहेरचे लोक येऊन अशा गोष्टी सांगतात. आम्ही महायुतीमध्ये एकत्र काम करत आहोत, पण आमच्या पक्षांच्या विचारधारा वेगळ्या आहेत. इतर राज्यात हे चालेल, पण महाराष्ट्रात ते चालणार नाही.

दरम्यान, भाजपचा विरोध असताना देखील अजित पवारांनी नवाब मलिक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नवाब मलिक यांचे दाऊदसोबत संबंध असल्याचे आरोप भाजपने ठेवले होते तसेच त्यांना अटक देखील करण्यात आली होती. असे असून देखील महायुतीमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीत नवाब मलिक यांनी प्रवेश केला. एवढेच नव्हे तर अजित पवारांनी नवाब मलिक यांना उमेदवारी देखील जाहीर केली आहे. त्यामुळे महायुतीमध्ये अजित पवारांचे राष्ट्रवादी व भाजपमध्ये मतभेद असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

## गहाण ठेवलेला धनुष्यबाण आम्ही सोडवून घेतला - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




**कन्नड (अरुण थोरात) :** शिवसेना आणि धनुष्यबाण कुणाचा हे जनतेने गेल्या लोकसभा निवडणुकीत दाखवून दिले. त्यांनी(उबाठा) गहाण ठेवलेला धनुष्यबाण आम्ही सोडवून आणला आहे. असे परखड मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

ते दि. ११ नोव्हेंबर रोजी कन्नड येथे आयोजित शिवसेना उमेदवार संजनाताई जाधव यांच्या प्रचारसभेत बोलत होते. हे सामान्य जनतेचे सरकार आहे. कामन मैन ला सुपर मैन बनविचे आमचे स्वप्न आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा धनुष्यबाण त्यांनी गोठविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

एकनाथ शिंदे जे बोलतो ते करुण दाखवितो. लाडकी बहिण, भाऊ, शेतकऱ्यां साठी अनेक कल्याणकारी योजना आणल्या, त्यातील नीधीत अधिक भर घालण्याचे काम आम्ही करणार आहोत. कन्नड-सोयगाव मतदारसंघांतील रस्ते, औट्रमघाटातील बोगदा, शहरातील पाणीपुरवठा योजना, सुसज्ज हास्पिटल, कृषी व अभियांत्रिकी महाविद्यालय उभारणी, पर्यटन आदी विकास कामे आम्ही करणार आहोत. दिलेला शब्द पाळणे हा बाळासाहेबांचा वारसा पुढे घेऊण जाण्याचे काम हा एकनाथ शिंदे करतोय.

अशा तडाखेबाज भाषणातून विरोधांवर शब्दाचे बाण त्यांनी सोडले.

"कोरोना चे कारण सांगून त्यांनी शेतकऱ्यांना अतिवृष्टीत मदत केली नाही. आपले कुटूंब सांभाळत राज्य वार्यावर सोडले" अशी अप्रत्यक्ष टिका उबाठा वरती करत मा.केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे यांनी करत महाविकास आघाडी वर निशाणा साधला. "महायुतीच्या काळात संभाजीनगर जिल्ह्यात दमदार काम केले. शिंदे सारखा मुख्यमंत्री मी गेल्या तीस वर्षात पाहिला नाही.

धन्यबाण निशाणी वरती मतदान करुण भरघोस मतांनी विजयी करण्याचे अवाहन खा. संदिपान भुमरे यांनी यावेळी केले. माझी अवस्था सीते सारखी झाली आहे. माझे वाल्मिक माझी ही जनता आहे. मला या संकटातून बाहेर काढा, आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे वचन देत उमेदवार संजनाताई जाधव यांनी आपला जाहिरनामा उपस्थितां समोर मांडत मतदान करण्याचे अवाहन केले.

या प्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, मा.जिल्हाध्यक्ष विजय औताडे, शिवसेना जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, डॉ. संजय गव्हाणे, यांची प्रमुख उपस्थितीती होती. यावेळी काकासाहेब कवडे, बबनराव बनसोड, रत्नाकर पंडित, इंद्रजित चव्हाण, अमोल पवार, विकास बागुल यांनी शिवसेनेत प्रवेश केला. कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती जयेश बोरसे, रामेश्वर घनकर, प्रदीप बोडखे, कैलास जाधव, साहेबराव गवळी, सिध्देश्वर झाल्टे, ज्ञानेश्वर निकम, आदित्य गर्जे, आदि सह हजारो मतदार, नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४


# माय महोत्सवात पुरस्कार सोहळा व निमंत्रितांचे कवी संमेलन संपन्न




**साक्री :** तालुक्यातील झिरणीपाडा येथे कै.मालतीबाई पवार स्मरणार्थ माय महोत्सव दरवर्षी घेतला जातो. या वर्षी पुरस्कार सोहळा व निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोककवी प्रा.प्रशांत मोरे हे होते.

तर प्रमुख पाहुणे म्हणून गजमल पवार, उपकुलसचिव जळगाव विद्यापीठ, राज धनगर सिने अभिनेता, कवी नितीन चंदनशिवे कवठेमहांकाळ, आबा पाटील कर्नाटक, बबन सरोदे मुंबई, अर्जुन बांबेरे शहापूर, प्रा.दशरथ खोसे नगर, विजय पाटील नंदुरबार, नवनाथ पवार चिपलीपाडा, डॉ.नरेंद्र खैरनार साक्री, रघुवीर खारकर निजामपूर, प्रतिभाताई चौरे पिंपळनेर, अनिता गवळी पिंपळनेर, मांगीलाल गांगुर्डे चिपलीपाडा, गोकुळ पाटील निजामपूर, बाळासाहेब अहिरे संभाजीनगर, ॲड.सोमदत्त मुंजवाडकर सटाणा, देवा पवार कैटपाडा, तानाजी भालेराव मुंबई, हेमंत महाले निजामपूर, देवदत्त बोरसे नामपूर, विनोद बागुल बाळद, बबलू मोरे मालेगाव, शाम हिप्परगे सोलापूर, साईनाथ राहटकर नांदेड, हे होते. लोककवी प्रा.प्रशांत मोरे यांच्या अध्यक्षेखाली सर्व कार्यक्रम पार पडले.

सर्व प्रथम गावातून आदिवासी संस्कृतीवर आधारीत मिरवणूक काढण्यात आली. त्यात नंदी बैल, पावरी नृत्य, संबळ नृत्य या पथकांनी सहभाग घेतला. त्यानंतर कै.मालतीबाई पवार स्मरणार्थ विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात आले. त्यात ज्ञानेश्वर भामरे वाघाडी, प्रतिक मिठे दिंडोरी, अर्जुन बांबेरे शहापूर, प्रकाश पाटील पिंगळवाडेकर, प्रा.त्रिशिला साळवे पिंपळनेर, नितीन पाटील नंदुरबार, या मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार सोहळ्या नंतर निमंत्रितांचे कवी संमेलन लोककवी प्रा.प्रशांत मोरे यांच्या अध्यक्षेखाली पार पडले. निमंत्रितांच्या कवी संमेलनात नितीन चंदनशिवे कवठेमहांकाळ, आबा पाटील कर्नाटक, संतोष पावरा लक्कडकोट, वेदराज कपाटे सार्वे, शाम भामरे ब्राम्हणपाडे, यशश्री पवार चिपलीपाडा, अर्जुन बांबेरे शहापूर, विकास पाटील सुरत, जितेंद्र बहारे सुरत, या कवींनी माय महोत्सवात आपल्या बहारदार कविता सादर केल्या. प्रा.प्रशांत मोरे यांच्या आई व शेती मातीवरील कवितांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. निमंत्रित कवी संमेलनाचे सूत्रसंचालन नितीन चंदनशिवे यांनी आपल्या बहारदार शैलीत केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना देवरे यांनी केले.






# वडेट्टीवारांच्या लेकीची मोबाईल टॉर्चच्या उजेडात घ्यावी लागली सभा



**चंद्रपूर :** विधानसभा निवडणुकीची तारीख आता जवळ आली आहे. अशात प्रचार सभा जोरात सुरू असल्याचे दिसत आहे. कॉंग्रेसचे नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची देखील आकापूर येथे प्रचार सभा पार पडली. यावेळी त्यांची लेक शिवानी वडेट्टीवार यांनी जोरदार भाषण केले आहे. मात्र यावेळी बत्तीगुल झाल्याचे बघून महावितरण विभागावार देखील त्यांनी शिव्यांची लाखोली वाहिली आहे.

चंद्रपूर येथील ब्रह्मपुरी मतदारसंघातील सावली तालुक्यातील आकापूर या गावात शिवानी वडेट्टीवार यांची प्रचार सभा झाली. या गावात अनेक दिवसांपासून वीज पुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आले. जेव्हा शिवानी वडेट्टीवार गावात पोहोचल्या, तेव्हाही वीज गेलेली होती, त्यामुळे त्यांनी मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात सभा घेतली. यावेळी त्यांनी महावितरणच्या कर्मचाऱ्यांना शिव्यांची लाखोली वाहिल्याचे समोर आले आहे.

शिवानी वडेट्टीवार म्हणाल्या, तुमचे जीवन अंधारात टाकायचे काम भाजप सरकार करत आहे. महावितरणवाल्याला झापणार तर आहे, त्याची नाही काढली तर माझं नाव शिवानी विजय वडेट्टीवार नाही. भो**चे रात्रभर वीज घालवूनही यांना ८००-१००० रुपये बील पाठवायला लाज वाटत नाही. या लोकांची आम्ही फजिती करू. भाजप सरकारच्या कोणत्याच भूलथापांना बळी पडू नका. विजू भाऊंना बहुमताने निवडून द्यायचे आहे.

शिवानी वडेट्टीवार म्हणाल्या, विकास गुजरातचा होत आहे, तुमच्या गावाचा नाही. तुमच्या जीवनात अंधार पेरण्याचे काम भाजप करत आहे. तसेच, उद्या विजू भाऊ मोठ्या पदावर जाऊ शकतात. ते विरोधी पक्ष नेते असून उद्याचे मुख्यमंत्री असू शकतात, असे सांगत शिवानी वडेट्टीवार यांनी त्यांना निवडून देण्याचे आवाहन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४


## निवडणूक आयोग 'बटेंगे तो कटेंगे' सारख्या घोषणांवर कारवाई का करत नाही? अशोक गेहलोत




**मुंबई :** भारतीय जनता पक्षाने विरोधी पक्षांची सरकारे घोडेबाजार करून पाडली. हा देशाच्या इतिहासातील काळा अध्याय आहे. मध्य प्रदेश, कर्नाटक, गोवा, महाराष्ट्रात भाजपाने घोडेबाजार करून सरकार स्थापन केली. राजस्थानमध्येही भाजपाने प्रयत्न केला, पण त्यात त्यांना यश आले नाही. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार भाजपाने चोरले, त्याचा बदला घेण्याची वेळ आता आली आहे. भाजपाला विधानसभेच्या निवडणुकीत धडा शिकवून घरी बसवा व काँग्रेस मविआचे सरकार विजयी करा, असे आवाहन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी सोमवारी केले.

राजीव गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत अशोक गेहलोत संबोधित करत होते. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात देशाला दिशा दाखवण्याचे काम केले. या भूमीतून अनेक मोठे नेते होऊन गेले. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. महाराष्ट्र देशातील आघाडीचे राज्य असून विधानसभेची ही निवडणूक देशाची दिशा व दशा ठरवणारी आहे, या निवडणुकीचा संदेश देशभर जाणार आहे.

काँग्रेस मविआकडे अनेक अनुभवी नेते आहेत, ज्यांनी सरकार चांगल्या प्रकारे चालवले आहे. काँग्रेसच्या ५ गॅरंटी व मविआने महाराष्ट्रनामा मधून जनतेच्या हिताचे वचन दिले आहे. महिलांना प्रति महिना ३००० रुपये, मोफत बस प्रवास, २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा, शेतकऱ्यांना ३ लाखांची कर्जमाफी यारख्या लोकोपयोगी योजनांचे आश्वासन दिले आहे. भारतीय जनता पक्ष फक्त जाहिरताबाजी करून जनतेची दिशाभूल करत असते. पण त्याला आता महाराष्ट्रातील जनता भुलणार नाही.

भाजपा एक मुख्यमंत्री 'बटोंगे तो कटोंगे' असा नारा देत आहे, तर दुसरीकडे पंतप्रधान 'एक हैं तो सेफ हैं', चा नारा देत आहेत. पण निवडणूक आयोग त्यावर काहीच कारवाई करत नाही. निवडणूक आयोगही सरकारच्या दबावाखाली काम करत आहे. महाराष्ट्रातील निवडणुकीच्या तारखा ज्या पद्धतीने जाहीर करण्यात आल्या आहेत त्यामागेही मोठे षडयंत्र आहे, असे अशोक गेहलोत म्हणाले.

मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यावेळी म्हणाल्या की, महाराष्ट्रातील भाजपा युती सरकारच्या काळात आरोग्य सेवा पूर्णपणे कोलमडलेली असून मुंबईत २७ टक्के वैद्यकीय कर्मचारी कमी आहेत. MRI, CT scan मशिन बंद आहेत, औषधांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा आहे. याउलट राजस्थानमध्ये अशोक गेहलोत यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारने आरोग्य सेवा सुलभ व वाजवी दरात मिळावी यासाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या. आरोग्याचा मुलभूत अधिकार लागू करणारे राजस्थान हे पहिले राज्य आहे. या योजनांचा गाभा चिरंजीवी योजना आहे. २५ लाख रुपयांचे आरोग्य विमा कवच दिले, १० लाख रुपयांचा कुटुंब अपघात विमा योजना सुरु केली होती. चिरंजीवी योजनेतून मोफत औषधे देण्यात येत होती असेही गायकवाड यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया व पब्लिसिटी विभागाचे चेअरमन पवन खेरा, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस सचिन सावंत, प्रदेश काँग्रेसचे

## महाराष्ट्रात नासकी, फुसकी मोदी गॅरंटी चालत नाही : उद्धव ठाकरे



**यवतमाळ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यातील महायुती सरकारवर निशाणा साधला. मोदी - शहांनी अवघा महाराष्ट्र विक्रीस काढला आहे. मोदींची नासकी, फुसकी व खोटी गॅरंटी आज महाराष्ट्रात चालत नाही. येथे केवळ बाळासाहेबांचे खणखणीत नाणे चालते. त्यामुळेच त्यांच्यावर महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो लावून प्रचार करण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या बॅगा तपासण्याच्या मुद्यावरून प्रशासनालाही चांगलेच धारेवर धरले.

उद्धव ठाकरे यांची सोमवारी यवतमाळच्या वणी विधानसभा मतदारसंघात प्रचारसभा झाली. त्यात त्यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह राज्यातील महायुती व त्यांच्या सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, आता मला फार भाषण करण्याची गरजच लागत नाही. कारण, मी जिथे जात आहे, तिथे मला मतदार विजयाची ग्वाही देत आहेत. फक्त आता २० तारखेला न्यायदेवतेसारखी आपल्या डोळ्यांवर कशाहीची पट्टी बांधू नका. डोळसपणे मतदान करा.

ते पुढे म्हणाले, मी येथे प्रचाराला आल्यानंतर ७-८ अधिकाऱ्यांनी माझी बॅग तपासली. मी त्यांना त्याची परवानगी दिली. मी त्यांचा व्हिडिओ काढला. पण यापुढे कुणाची बॅग तपासण्यात आली, तर प्रथम त्या अधिकाऱ्याचे ओळखपत्र तपासा, तो कुठल्या हुद्द्यावर आहे हे जाणून घ्या. जसे ते तुमचे खिसे तपासत आहेत, तसेच त्यांचेही खिसे तपासा. हा आपला अधिकार आहे. जिथे कुठे नाकानाक्यावर अडवतील तिथे - तिथे तपास अधिकाऱ्यांचे खिसे तपासा.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाजपच्या बटेंगे तो कटेंगे या नाऱ्याचाही समाचार घेतला. आम्ही बटणारही नाही आणि कटणार नाही. भाजपचे धोरण महाराष्ट्राची लूट करून मित्रांना देण्याचे आहे. पण आम्ही तुम्हाला ही लूट करू देणार नाही. भाजपचे खरे धोरण हे बाटेंगे व लुटेंगे हे आहे. सध्या महाराष्ट्राची लूट सुरू आहे. महाराष्ट्राने मोदी, शहा व अदानींकडे भीक मागावी असा त्यांचा मानस आहे. त्यानंतर ते आम्ही हे केले ते केले हे म्हणणार. पण त्यांनी काहीच केले नाही हेच सत्य आहे.

स्वतः मोदींवर हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेऊन मते मागावी लागत आहेत. ही आपल्या बाळासाहेबांची पुण्याई व तुम्हा सगळ्यांचे कर्तृत्व आहे. काल नांदेडला होते. तिथे त्यांनी बाळासाहेबांची प्रशंसा केली. आजपर्यंत ते केवळ मी - मी चा नारा देत होते. कारण आता त्यांच्या लक्षात आले आहे की, महाराष्ट्रात मोदींची सडकी, नासकी, कुजकी, गळकी गॅरंटी चालत नाही. इथे मोदींची खोटी गॅरंटी चालत नाही. इथे केवळ बाळासाहेब ठाकरे यांचे नाणे चालते, असेही उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.

उद्धव पुढे म्हणाले, लोकशाहीत कुणीही मोठा किंवा छोटा नाही. त्यांनी सर्वांना समान वागणूक देण्याची शपथ घेतली होती. त्यामुळे त्यांनी महाविकास आघाडीच्या प्रचारालाही आले पाहिजे. ते काही एकट्या भाजपचे पंतप्रधान नाहीत. तुम्ही देशाचे पंतप्रधान आहात. त्यांना आवडता व नावडता करण्याचा अधिकार नाही. सध्या मोदी - शहा दररोज महाराष्ट्रात येत आहेत. ते काहीच वेगळे बोलत नाहीत.

## राज ठाकरेंनी रक्ताचे नाते जपले, अजूनही वेळ गेली नाही : बाळा नांदगावकर

**मुंबई :** आम्ही नाती जपली, पण राज ठाकरेंनी रक्ताचे नाते जपले, असे म्हणत मनसे नेते व शिवडीचे उमेदवार बाळा नांदगावकर यांनी उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा साद घटल्याचे दिसून येत आहे. आदित्य ठाकरे वरळीमधून उभे होते तेव्हा आपल्या घरातील व्यक्ती उभा आहे असे समजून राज ठाकरेंनी उमेदवार दिला नव्हता. पण अजूनही वेळ गेली नाही, असे बाळा नांदगावकर म्हणाले आहेत.

बाळा नांदगावकर म्हणाले, माहीमची उमेदवारी आधी आम्ही जाहीर केली, नंतर उद्धव ठाकरेंनी जाहीर केली. उद्धव ठाकरेंनी अमित ठाकरेंसमोर उमेदवार द्यायला नको होते. उद्धव ठाकरे यांनी उमेदवार दिलाच पण शिंदे यांनी देखील दिला आहे. मात्र अजूनही वेळ गेली नाही. शेवटी जे काही वैभव, मान-सन्मान आम्हाला मिळाला आहे ते याच ठाकरे कुटुंबामुळे मिळाला आहे. ते जपणे आवश्यक होते. याबाबत विचार व्हायला हवा होता, असे ते म्हणाले.

अमित ठाकरे यांच्याविषयी बोलताना बाळा नांदगावकर म्हणाले, अमित ठाकरे मनातून फार हळवे आहेत. अगदी बाळासाहेबांप्रमाणे ते आहेत. सगळे ठाकरे असेच आहेत. अमित ठाकरे निवडणूक लढवतील याबाबत खरेच कल्पना नव्हती. मात्र पक्षातील नेत्यांनी निवडणूक लढायला हवे असे मत त्यांनी मांडले. त्यानंतर निवडणूक लढवण्याबाबत चर्चा सुरू झाली, असे नांदगावकर यांनी स्पष्ट केले आहे.

राज ठाकरे यांच्याबद्दल बोलताना बाळा नांदगावकर म्हणाले, राज ठाकरे यांच्या पोटात जे असते तेच ओठात असते, ते जे आहे ते सडेतोड बोलतात. आम्ही नाती जपली पण त्यांनी खरच रक्ताचे नाते जपले आहे. आदित्य उभा होता तेव्हा ठाकरे घराण्यातला व्यक्ती उभा आहे हे लक्षात घेऊनच त्यांनी उमेदवार दिला नाही. राजकारणाच्या पलीकडचे नाते जपण्याचे काम कायमच राज ठाकरे यांनी केले आहे. तसेच पुढे बोलताना निवडणुकीच्या निकालानंतर जो सत्तेत बसेल तो आमच्याच पाठिंब्यानेच बसेल, असा विश्वास देखील बाळा नांदगावकर यांनी व्यक्त केला आहे.